यवतमाळ दि. गुरुवार ५ नोव्हेंबर २०२६

आजचे तापमान

कमाल	किमान
२८ से.°	२४ से.°

हवामानाचा अंदाज
थंड वातावरण

दैनिक लोकसूत्र

● वर्ष - पाचवे ● अंक १७५ ● किंमत ३ रु. E-mail : Loksutra@gmail.com RNI NO.MAHMAR/2022/83119

नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा द्वारा संचालित

श्रीमती सुमित्राबाई ठाकरे कॉलेज ऑफ नर्सिंग

प्लॉट नं.पी.-३, एम.आय.डी.सी.एरिया, लोहारा, यवतमाळ

G.N.M. (3 वर्ष)
पात्रता : HSC (सायन्स, कॉमर्स, आर्ट) सायन्स विद्यार्थ्यांना प्राधान्य

A.N.M.(2 वर्ष)
पात्रता : HSC (सायन्स, कॉमर्स, आर्ट) फक्त मुलींकरिता

P.B. BSC NURSING
पात्रता : GNM

B.Sc. Nursing
4 वर्ष पदवी अभ्यासक्रम
पात्रता : HSC (सायंस) PCB ग्रुप मध्ये 45%
MH B.Sc Nursing CET
जागा : 40

ANM/GNM/B.Sc.(N)
शासन निर्णयानुसार शिष्यवृत्ती लागू

अधिक महितीकरिता संपर्क
टिप : शासकीय नियमानुसार सर्व्हिसलिप लागू ANM, GNM व BASIC B.Sc. (नर्सिंग) करिता
9561537762, 9130645861

हास्यटोला



सुरेश राऊत (सुदंश)

न्यूज Crime



माईकवर अनाऊंसमेंट केल्याने मारहाण

यवतमाळ : फिर्यादीने त्याच्या गावामध्ये गोमाता स्पर्धा असल्याने स्पर्धेत गार्यला कोणी मारू नये, असे माईकमध्ये अनाऊंसमेंट केली होती. त्याचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादी हा घरासमोर उभा असताना वाद घातला. त्याच्या घरापुढे जाऊन हा गोमाता स्पर्धेमध्ये शहाणपणा करत होता असे म्हणत शिवीगाळ केली. काठीने फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केले. ही घटना ३ नोव्हेंबरला दुपारी ३ वाजता पुसद तालुक्यातील वागद येथे घडली. शंकर श्रीराम व्यवहारे (५२) रा. वागद इजारा, ता. महागाव असे फिर्यादीचे तर गोकूळ सीताराम आडे (२६) अधिक एक रा. चिचपाड, ता. महागाव असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी पुसद ग्रामीण पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

बोकूड चोरी

यवतमाळ : फिर्यादीच्या मालकीचा आठ महिन्यांचा तब्बल आठ हजार रुपये किमतीचा बोकूड कुणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला. चोरीची ही घटना ३ नोव्हेंबरला दुपारी १२.३० वाजता तालुक्यातील गळव्हा येथे घडली. अतुल जनार्दन गजभिये (३८) रा. गळव्हा असे फिर्यादीचे तर दिनेश भिमरावजी अंजेकर (३५) रा. गळव्हा असे गुन्हे दाखल झालेल्या संशयीताचे नाव आहे. या प्रकरणी यवतमाळ ग्रामीण पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत.

९०० च्या घरात न्यायालयीन प्रकरणे, पॅनलवरील वकिलांच्या सक्सेस रेटवर प्रश्नचिन्ह, विधी सल्लागारांशी विभागप्रमुखांचा समन्वय नगण्य

'झेडपी' मागे कोर्ट-कचेरीचे शुक्लकाष्ठ

■ केशव सवळकर

यवतमाळ : जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागासह पंचायत, आरोग्य, शिक्षण, बांधकाम क्र.१ व २, सिंचन, तसेच पाणीपुरवठा विभागामागे कोर्ट-कचेऱ्याचे शुक्लकाष्ठ लागले आहे.हायकोर्टासह सुप्रीम कोर्ट, कामगार व जिल्हास्तरीय न्यायालयात बाजू मांडण्यासाठी पॅनलवरील १४ वकिलांची फौज आहे. त्याउपरही जिल्हा परिषदेकडून निकाल लागण्याच्या सक्सेस रेटवर प्रश्नचिन्ह उभे झाले आहे. विधी सल्लागार नेमूनही झेडपीच्या प्रमुखांना खुद्द उच्च न्यायालयात शाब्दिकरीत्या फटकारले जात असेल तर अपयश कुणाचे, हा प्रश्न आहे.

यवतमाळ जिल्हा परिषदेला वैभवशाली वारसा आहे. राज्याचे मुख्यमंत्री राहिलेल्या कै. सुधाकरराव नाईकांनी या जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सांभाळले आहे. इतकेच नव्हे तर महाराष्ट्रालाच पंचायतराज व्यवस्था म्हणजे काय, हे दाखवून देणारे व महाराष्ट्राचे सलग ११ वर्ष मुख्यमंत्री राहिलेले कै. वसंतराव नाईक याच जिल्ह्यातील सुपूत्र आहेत. सध्या जिल्हा परिषदेत न्यायालयीन खटल्याचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. अनेक खटल्यांमध्ये झेडपी प्रशासन बॅकफूटवर पडत आहे. हायकोर्टात बाजू मांडण्यासाठी एका प्रकरणाकरिता पॅनलवरील वकिलाला १५ हजार रुपये तर जिल्हास्तरावर साडेसात हजार रुपये फी दिली जाते. मात्र, जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांची मिळून



रखडलेली ९०० प्रकरणे पॅनलवरील वकिलांच्याही कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह लावणारी आहे. प्रामुख्याने यामध्ये पॅनलवरील वकिलांचा कुठलाही दोष नसल्याचे सांगितले जाते. ज्या विभागाविरुद्ध न्यायालयीन प्रकरणे दाखल आहेत, त्या विभागाने संबंधित खटल्यासंदर्भातील कागदपत्रे, मूळ फाईली किंवा * पान ४ वर

२०२४-२५ मध्ये निरीक्षण टिपणीतील प्रलंबित खटले

साप्रवि -	१११
पंचायत	४७
आरोग्य	२२३
शिक्षण	४३
बांधकाम-१	९५
बांधकाम-२	४०
सिंचन	११५
पाणीपुरवठा	१४
एकूण	६८८

'शिक्षण'च्या खटल्यात नामुष्की

मध्यंतरी शिक्षण विभागाच्या नागपूर उच्च न्यायालयातील एका खटल्या दरम्यान झेडपी प्रशासनाची न्यायालयीन बाजू चव्हाट्यावर आली. यामध्ये न्यायाधिशांनी थेट राज्य शासनाच्या मुख्य सचिवांना यवतमाळ झेडपीच्या न्यायिक खटल्यातील दिरंगाईवर फोन लावून बोलावे, हा नामुष्कीचा विषय ठरला. त्यामुळे विद्यमान सीईओंनी आधी न्यायालयीन प्रकरणांचा गुंता सोडविण्याची गरज आहे.

न्यायालयीन खटल्यांसाठी रोडमॅप हवा

जिल्हा परिषदेने न्यायालयीन खटल्यांसाठी विधीकक्ष उभारला आहे. विधी सल्लागारांची नियुक्ती केली आहे. या कक्षामध्ये खरे तर प्रत्येक विभागाचा एक नोडल अधिकारी न्यायालयीन खटल्यांच्या समन्वयासाठी नेमण्याची गरज आहे. ज्याने प्रत्येक प्रकरणाचा पाठपुरावा करणे अपेक्षित आहे. मुदतीत ॲफिडॅव्हिट दाखल करणे गरजेचे असते. न्यायालयातून नोटीस आल्यावर ठरावीक मुदतीत कागदपत्रे गोळा करून उत्तरे दाखल करण्याची सक्ती करायला हवी. झेडपीचे सीईओ आता न्यायालयीन खटल्यासंदर्भात वारंवार आढावा घेत आहेत. मात्र, अपयशाचे मूळ कुठे दडले, यावरच फोकस केला जात नाही.

पूर्व कायदेशीर चाचणी गरजेची

जिल्हा परिषदेच्या सीईओंनी कोणताही मोठा निर्णय जसे निलंबन किंवा धोरणात्मक आदेश काढण्यापूर्वीच विधी सल्लागाराचे कायदेशीर मत घेणे अनिवार्य ठरते. जेणेकरून भविष्यातील न्यायालयीन खटले टळू शकतील. पॅनलवर वकिलांची फौज असताना त्यांच्याकडील प्रकरणांचा ट्रॅकरेकॉर्ड किंवा सक्सेसरेट तपासणारी यंत्रणा झेडपीकडे का नाही, हासुद्धा प्रश्न आहे. केस मॅनेजमेंट सिस्टिम आणि डॅशबोर्ड आवश्यक आहे. प्रत्येक प्रकरणाचे डिजिटल ट्रॅकिंग सुरू करावे लागेल. न्यायालयात पुढील तारीख कोणती आहे, त्या दिवशी काय सादर करायचे या संदर्भात समन्वयाची गरज आहे.

मुख्याध्यापकांसह बीईओंच्याही निलंबनाची मागणी

मुडाण्यातील शाळेत निकृष्ट धान्य

पीएमश्री शाळेच्या धान्यप्रकरणात धक्कादायक खुलासे

■ लोकसूत्र प्रतिनिधी

महागाव : मुडाण्यातील पीएमश्री शाळेत मध्यान्ह भोजनासाठी वापरलेल्या निकृष्ट दर्जाच्या धान्याचा प्रकार चांगलाच गाजतो आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या संबंधितांविरुद्ध संताप वाढला आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी नेमलेल्या समितीने शाळेला भेट दिली. समितीच्या अहवालात आता धक्कादायक खुलासे पुढे येत आहेत.

मुडाण्यातील पीएमश्री शाळेतील निकृष्ट दर्जाच्या * पान ४ वर

ओढ्याच्या काठावर शेकडो मुदतबाह्य पाकिटे!

शाळेच्या इमारतीमागे एका ओढ्याच्या काठावर मुदतबाह्य मसाला व हळदीची पाकिटे आढळली. समितीने केलेल्या पंचनाम्यात रसानी कंपनीची २०० ग्रॅमची ११ हळदीची पाकिटे, कांदा-लसूण मसाल्याची वेगवेगळ्या मुदत समाप्तीच्या तारखांची एकूण ६१६ पाकिटे आढळली. यामध्ये नोव्हेंबर २०२५ मध्ये मुदत संपलेली १७६ तर ऑगस्ट २०२५ मध्ये मुदत संपलेली १३४ पाकिटे होती. जून २०२५ मध्ये मुदत संपलेली १०९ पाकिटे आणि एप्रिल २०२५ मध्ये मुदत संपलेली १९७ पाकिटे होती.

मुख्याध्यापकांचा खुलासा काय ?

मुख्याध्यापकांनी दिलेल्या बयाणानुसार ऑगस्ट २०२५ मधील अतिवृष्टीमुळे हे साहित्य खराब झाले होते आणि ते ओढ्याच्या काठी पुरून ठेवले होते. मात्र प्रत्यक्ष आढळलेल्या पाकिटांच्या उत्पादन आणि मुदत समाप्तीच्या तारखा या स्पष्टीकरणाशी विसंगत असल्याचे समितीने नमूद केले आहे. या विसंगतीवरून मुख्याध्यापक प्रथमदर्शनी दोषी असल्याचा ठोस निष्कर्ष समितीने काढला आहे.

सेस फंडाचा निधी अखर्चितच, मोहीम अधिकारी चिरीमिरीत 'प्रवीण'

'झेडपी'चा कृषी विभाग 'सलाईन'वर!



■ केशव सवळकर

शेतकऱ्यांचा 'लहू' शोषण कोण करतोय ?

मोहीम अधिकाऱ्यांची मोहीम कुठे ?

यवतमाळ : जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाला यंदा सेसमधून दोन कोटी ७४ लाख रुपयांचा नियतव्यय १३ योजनांसाठी उपलब्ध करून दिला. मात्र, हा निधी खर्ची घालण्यात कृषी विकास अधिकारी व त्यांची यंत्रणा फेल ठरली आहे. मोहीम अधिकारी परवानाधारक कृषी साहित्य केंद्राच्या तपासणीआड चिरीमिरी घेण्यात 'प्रवीण' झाले आहेत. झेडपी सीईओंसह कृषीच्या वरिष्ठांचीही या गंभीर बाबीवर होणारी डोळेझाक संतापजनक आहे. शेतकऱ्यांचा 'लहू' (रक्त) कोण शोषण करतोय, हा संशोधनाचा विषय आहे.

जिल्हा परिषदेचा कृषी विभाग स्वतःच सलाईनवर असल्याचे चित्र दिसून येत आहे. एकीकडे दरवर्षीचा सेस फंड (स्वउत्पन्न निधी) वेळेत खर्च न झाल्यामुळे लाखो रुपयांचा निधी पडून राहतो किंवा अखर्चित राहून परत जातो, तर दुसरीकडे प्रत्यक्ष अंमलबजावणीची जबाबदारी असणारे जिल्हा कृषी विकास अधिकारी व मोहीम अधिकारी मात्र शेतकऱ्यांच्या हितापेक्षा स्वतःच्या प्रवीणतेत व्यस्त असल्याची तीव्र चर्चा शेतकरीवर्गात * पान ४ वर

कृषी विभागाच्या गाइडलाइननुसार मोहीम अधिकारी हे कृषी विकास अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली काम करणारे वर्ग-२ दर्जाचे वर्गिकृत अधिकारी असतात. खरीप व रब्बी हंगामातील पिकांच्या लागवडीचे नियोजन, कीड-रोग नियंत्रण मोहीम राबवणे आदी कामे त्यांच्याकडे आहेत. मात्र, हे मोहीम अधिकारी खतनियंत्रण आदेश १९८५ व बियाणे ॲक्ट १९६६ व कीटकनाशक कायदा १९६८ अंतर्गत कृषी सेवा केंद्रांची तपासणी, बोगस बियाणे व बनावट खतांवर धडक कारवाई करण्याच्या मोहिमेत दुसरीच मोहीम राबवित असल्याचे पुढे येत आहे.

एडीओ अन् मोहीम अधिकाऱ्यात विसंवाद

जिल्ह्यात झेडपी कृषी विभागाच्या उपयोगितेवरच प्रश्नचिन्ह उभे झाले आहे. या विभागाकडे सीईओंसह जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, आदिवासी विकासमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके व अन्य आमदारांचेही दुर्लक्ष आहे. या विभागात जिल्हा कृषी विकास अधिकारी व मोहीम अधिकाऱ्यात अंतर्गत विसंवाद आहे. मध्यंतरी मोहीम अधिकाऱ्यांकडे एडीओचा प्रभार होता. खरीप व रब्बी हंगामात अनेक केंद्रांकडून तपासणीच्या नावाखाली झालेली वसुलीही चर्चेत आली. आता दिवाळीही कॅश करण्याची मोहीम राबविली जात आहे.

पतसंस्थेचे पदाधिकारी अजमिरे जागीच ठार

कार रस्त्याच्या बाजुला धडकून चेंदामेंदा

भरधाव चारचाकीचा टायर फुटल्याने भीषण अपघात



■ लोकसूत्र प्रतिनिधी

कळंब : भरधाव वेगातील चारचाकीचा टायर अचानक फुटला. परिणामी, वाहन अनियंत्रित होऊन ते रस्त्याच्या कडेला जाऊन आदळले. यामध्ये वाहनातील एकजण जागीच ठार झाला. अपघाताची ही गंभीर घटना कळंबपासून अवघ्या ७ किमी अंतरावरील यवतमाळ-नागपूर रोडवरील बेलोना गावाजवळ आज सकाळी ९ वाजेच्या दरम्यान घडली.

सुरेश नारायण अजमिरे (४०) रा. प्रजापतीनगर, यवतमाळ असे मृतकाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार यवतमाळातील ग्रामीण विकास मल्टिस्टेट पतसंस्थेचे कार्यकारी संचालक व संताजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सुरेश अजमिरे हे यवतमाळ येथून वर्धा येथे आपल्या चारचाकी वरना वाहनाने नागपूर रोडने जात होते. दरम्यान बेलोना गावाजवळ आल्यानंतर अचानक त्यांच्या वाहनाचा टायर फुटला. परिणामी, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून वाहन रस्त्याच्या बाजूला जोरात जाऊन धडकले. धडक इतकी जोरदार होती की, * पान ४ वर

जिल्ह्यात १४ तालुक्यांत २६९९ शेतकरी, ६९६५.६० हेक्टर जमीन ताब्यात, शासनस्तरावर प्रस्ताव प्रलंबित

देवस्थानची जमीन कसणाऱ्यांच्या मदतीचा तिढा

■ केशव सवळकर

यवतमाळ : जिल्ह्यात देवस्थान इनाम जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या १४ तालुक्यात तब्बल दोन हजार ६९९ एवढी आहे. सहा हजार ९६५.६० हेक्टर देवस्थानची जमीन हे शेतकरी कसत आहेत. वर्षानुवर्ष जमीन कसूनही त्यांना कृषी विभागासह शासनाच्या अन्य विभागांच्या योजना व नैसर्गिक आपत्तीची मदतही मिळत नाही. त्यामुळे ही जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या मदतीचा तिढा निर्माण झाला. मात्र, आता यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी या शेतकऱ्यांची व्यथा राज्याच्या मुख्य सचिवांपुढे मांडली आहे.

शेतकरी राजा जेव्हा निसर्गाच्या लहरीपणाशी आणि आर्थिक संकटांशी रोज दोन हात करतो, तेव्हा शासकीय योजनांचा आधार त्याला संजीवनी देण्याचे काम करतो. परंतु जिल्ह्यात पिढ्यानपिढ्या देवस्थानच्या जमिनी कसूनही ७/१२



वर स्वतःचे नाव नसल्यामुळे दोन हजार ६९९ शेतकरी शासकीय योजनांच्या लाभापासून कोसो दूर राहिले आहेत. आकडेवारीनुसार जिल्ह्यात ६,९६५.६० हेक्टर देवस्थान इनाम जमीन असून २,६९९ शेतकरी ती कसतात; परंतु 'मालकी हक्क' नावाच्या तांत्रिक जाळ्यात अडकून हा शेतकरी वर्ग शासकीय मदतीसह * पान ४ वर

पीकविमा आणि दुष्काळी भरपाईचा पेच

अवकाळी पाऊस, अतिवृष्टी किंवा दुष्काळात शासनाकडून मिळणारी नुकसानभरपाई किंवा प्रधानमंत्री पीकविमा योजनेचा लाभ केवळ ७/१२ वरील नोंदींच्या आधारे दिला जातो. जमीन देवस्थानच्या नावे असल्याने वैयक्तिक पातळीवर राबणाऱ्या शेतकऱ्याच्या हातात मदतीचा एकही रुपया पडत नाही.

कर्जमाफी आणि 'फार्मर आयडी'चा प्रश्न

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' असो वा इतर कृषी कर्जमाफी, यासाठी फार्मर आयडी आणि आधार प्रमाणीकरण सक्तीचे आहे. सातबारावर नाव नसलेल्या देवस्थान जमिनींच्या कुळांना व वहिवाटधारकांना फार्मर आयडी मिळवणे अशक्य ठरत असल्याने ते कर्जमाफीच्या लाभापासून पूर्णपणे वंचित राहिले आहेत.

चिंतनाची गरज

नवीन कायद्याचे व धोरणाचे कागदावर स्वागत होत असले, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत जिल्ह्यातील हे २,६९९ शेतकरी दरवर्षी प्रत्येक संकटात उपेक्षित राहत आहेत. कायद्याची प्रतीक्षा न करता जिल्हा प्रशासनाने व महसूल विभागाने या वहिवाटदार शेतकऱ्यांसाठी तात्पुरता तांत्रिक पर्याय शोधणे गरजेचे आहे, जेणेकरून हक्काच्या घामातून शेती फुलवणारा हा शेतकरी शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही. सरकार आणि प्रशासनाला आत्मपरीक्षण करायला लावणारी ही वस्तुस्थिती असून, यावर तातडीने पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

महसूलचे नवे धोरण आशेचा किरण

या गंभीर समस्येची दखल घेत सरकारने राज्यभरातील सुमारे ४.५ लाख हेक्टरहून अधिक देवस्थान इनाम जमीन मुक्त करण्यासाठी नवीन 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायदा' आणण्याची प्रक्रिया वेगात सुरू केली आहे.

काय आहेत कायद्यातील तरतुदी ?

या नवीन धोरणानुसार, प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या कुळांना आणि वहिवाटदारांना भोगवटादार वर्ग-१ (-१) म्हणून कायदेशीर मालकी हक्क दिला जाणार आहे. यासाठी रेडी रेकनर दरानुसार निश्चित केलेले अधिमूल्य (शुल्क) शासनाकडे भरावे लागेल, जी रक्कम संबंधित देवस्थानच्या मंदिरांच्या व्यवस्थापनासाठी वापरली जाईल.

धोरणासाठी समितीचे गठन

या कायद्याचे प्रारूप अंतिम करण्यासाठी आणि हरकती-सूचनांचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन केली असून, जिल्हास्तरावर माहिती गोळा करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

तालुकानिहाय देवस्थान जमीन व शेतकरी

तालुका	शेतकरी	क्षेत्र (हे.आर.)
वणी	३११	७३०.००
यवतमाळ	८६	४२०.७३
आर्णी	१३	१०७.८१
बाभूळगाव	१५८	५७३.०४
केळापूर	२५९	५५६.९७
घाटंजी	४६०	७१०.००
झरी जामणी	निरंक	निरंक
मारेगाव	निरंक	निरंक
राळेगाव	७७	१६०.७५
कळंब	५६४	१९३३.८०
दारव्हा	२८१	६२८.८४
नेर	१७७	३८७.५२
पुसद	६७	१३५.७६
दिग्रस	७५	२५७.००
उमरखेड	१३२	२७८.२८
महागाव	३९	८५.१०
एकूण	२६९९	६९६५.६०

स्वत:शीच दुरावतांना...

कधी दुसऱ्यांचा बंगला पाहून आपलं घर लहान वाटतं, तर कधी दुसऱ्यांची गाडी पाहून आपली प्रगती खुजी वाटते. कुणाचा पगार पाहून आपल्या कमाईचं मोल कमी वाटतं तर कुणाचं हसतं-खेळतं कुटुंब पाहून आपल्याच आयुष्यात काहीतरी कमी असल्याची जाणीव होते, पण एक प्रश्न आपण स्वत:ला कधी विचारतो का? दुसऱ्यांचं आयुष्य सुंदर दिसतं कारण आपण त्यांच्या संघर्षांची पानं वाचलेली नसतात! दुसऱ्यांचं आयुष्य आपल्याला जितकं सुंदर दिसतं, तितकंच ते खरोखर सुंदर असतं का?

खरं तर, दुसऱ्यांचं आयुष्य आपल्यापेक्षा चांगलं वाटण्यामागे एक साधं मानसशास्त्र आहे. आपण स्वत:च्या आयुष्यातील अडचणी, अपयश, चिंता आणि संघर्ष जवळून अनुभवतो. मात्र, दुसऱ्यांच्या आयुष्यातील यश, पैसा, प्रतिष्ठा आणि आनंद आपल्याला ठळकपणे दिसतो. आपण त्यांच्या आयुष्याची सुंदर बाजू पाहतो आणि आपल्या आयुष्यातील अडचणींशी तिची तुलना करतो. इथूनच असमाधानाची सुरुवात होते. आपण दुसऱ्यांच्या आयुष्याचं बाहेरचं चित्र पाहतो, पण त्या चित्रामागची किंमत आपल्याला माहीत नसते.

एखादा नोकरदार मित्र महागडी गाडी घेऊन कार्यालयात येतो. त्याची गाडी पाहून आपल्याला वाटतं, याचं आयुष्य किती छान आहे! पण त्या गाडीसाठी घेतलेलं कर्ज, दरमहा भरावा लागणारा हप्ता आणि घरखर्च सांभाळताना होणारी त्याची ओढाताण आपल्याला दिसत नाही. आपण गाडी पाहतो, पण तिच्यामागची आर्थिक जबाबदारी पाहत नाही.

एखादा व्यावसायिक मोठ्या हॉटेलमध्ये जेवताना, परदेशात फिरताना किंवा सोशल मीडियावर आनंदी छायाचित्रं टाकताना दिसतो. तेव्हा त्याचं आयुष्य किती मस्त आहे, असं वाटतं, पण व्यवसायातील चढ-उतार, कर्मचाऱ्यांचे पगार, ग्राहकांची देणी, बँकेचे हप्ते आणि उद्याच्या उत्पन्नाची चिंता यांच्याशी तो झुंजत असू शकतो. त्याच्या आयुष्यात पैसा असेल, पण मन:शांती असेलच याची खात्री कोण देणार?

म्हणजेच प्रत्येकाच्या आयुष्यात काहीतरी मिळालेलं असतं आणि काहीतरी मिळवण्यासाठी धडपड सुरू असते.

नोकरी करणाऱ्याला व्यवसाय करणारा सुखी वाटतो. कारण त्याला स्वत:चा मालक व्हायचं असतं. व्यवसाय करणाऱ्याला मात्र निश्चित पगाराची नोकरी सुरक्षित वाटते. गृहिणीला नोकरी करणाऱ्या स्त्रीचं आर्थिक स्वातंत्र्य आकर्षक वाटतं तर नोकरी करणाऱ्या स्त्रीला घर आणि मुलांसाठी पुरेसा वेळ देता येत नसल्याची खंत असू शकते.

शहरात राहणाऱ्याला गावातील शांत जीवन हवंसं वाटतं, तर गावात राहणाऱ्याला शहरातील सुविधा आणि संधी खुणावत असतात.

मग प्रश्न असा पडतो की, सुख नेमकं कुठे आहे? नोकरीत, व्यवसायात, शहरात, गावात की पैशात? सुखाचं उत्तर केवळ परिस्थितीत नसतं ते परिस्थितीकडे आपण कसं पाहतो, यातही दडलेलं असू शकतं.

याचा अर्थ महत्त्वाकांक्षा बाळगू नये, प्रगतीची स्वप्नं पाहू नयेत किंवा अधिक चांगलं जीवन मिळवण्याचा प्रयत्न करू नये, असा अजिबात नाही. उलट, मोठी स्वप्नं पाहावीत, नवी कौशल्यं शिकावीत, आर्थिक स्थिती सुधारावी आणि स्वत:च्या क्षमतेचा विकास करावा. मात्र, हे करताना दुसऱ्यांच्या यशाकडे पाहून स्वत:ला कमी लेखू नये बसं एवढंच!

समजा, तुमच्या मित्राने पाच वर्षांत स्वत:चं घर घेतलं आणि तुम्ही अजूनही भाड्याच्या घरात राहता. त्याच्या यशाचा आनंद मानताना स्वत:च्या परिस्थितीचाही प्रामाणिकपणे विचार करायला नको का? तुमच्याकडे आज जे आहे, त्याचा योग्य वापर करून उद्या काय साध्य करता येईल, याची योजना आखू शकता. त्याचं घर तुमच्या अपयशाचा पुरावा नाही, ते त्याच्या प्रवासातील एक यश आहे. तुमचा प्रवास वेगळा असू शकतो आणि त्याची गतीही वेगळी असू शकते.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, सोशल मीडियावर दिसणारं आयुष्य आणि प्रत्यक्ष आयुष्य यांत मोठं अंतर असू शकतं. लोक अनेकदा आपल्या आयुष्यातील सर्वोत्तम क्षण जगासमोर मांडतात. वाढदिवस, सहली, नवीन वस्तू, यशाचे क्षण आणि आनंदी छायाचित्रं दिसतात. मात्र, निराशेच्या रात्री, कौटुंबिक मतभेद, आर्थिक अडचणी आणि मनातील अस्वस्थता क्वचितच दिसते. त्यामुळे दुसऱ्यांच्या निवडक आनंदाची तुलना आपल्या संपूर्ण आयुष्याशी करणं म्हणजे स्वत:वर अन्याय करण्यासारखं नाही का?

मग करायचं काय? दुसऱ्यांशी तुलना करण्याऐवजी कालच्या स्वत:शी तुलना करा. कालपेक्षा आज आपण काहीतरी नवीन शिकलो का? आपल्या सवयी सुधारल्या का? पैशांचं नियोजन अधिक चांगलं केलं का? कुटुंबासाठी वेळ दिला का? एखाद्या अडचणीवर मात केली का? या प्रश्नांची उत्तरं आपल्याला खरी प्रगती दाखवतील. दुसऱ्यांचं यश पाहून प्रेरणा घ्या. न्यूनगंड नको. दुसऱ्यांच्या चांगल्या गोष्टींतून शिका. स्वत:च्या आयुष्याचा तिरस्कार करू नका. आपल्याकडे जे नाही त्यासाठी प्रयत्न करा, पण जे आहे त्याचं मोलही ओळखा.

शेवटी, आयुष्य ही दुसऱ्यांशी जिंकण्याची स्पर्धा नाही तर स्वत:ला अधिक चांगलं घडवण्याचा प्रवास आहे. या प्रवासात प्रत्येकाची सुरुवात वेगळी, साधनं वेगळी, आव्हानं वेगळी आणि यशाची वेळही वेगळी असू शकते. म्हणून पुढच्या वेळी दुसऱ्याचं आयुष्य पाहून मनात असमाधान निर्माण झालं तर क्षणभर थांबा आणि स्वत:ला विचारा... मला खरंच त्यांच्यासारखं आयुष्य हवं आहे की, त्यांच्या आयुष्यात दिसणाऱ्या एखाद्या गोष्टीचा मला मोह झाला आहे? कारण कदाचित ज्या आयुष्याकडे पाहून तुम्हाला हेवा वाटतो, त्या व्यक्तीलाही तुमच्या आयुष्यातील एखाद्या गोष्टीचा हेवा वाटत असेल!

दुसऱ्यांचं आयुष्य किती सुंदर आहे, याचा हिशेब मांडण्यात आपलं आयुष्य खर्च घालणं कितपत योग्य आहे? स्वत:च्या आयुष्यात आनंद, समाधान आणि प्रगतीची फुलं कशी फुलतील, यासाठी वेळ देणं योग्य नाही का? कारण दुसऱ्यांच्या आयुष्याशी तुलना करण्यात आपण आपला आनंद हरवतो, पण स्वत:च्या आयुष्याला योग्य दिशा देण्यात आपण खऱ्या अर्थाने समृद्ध होतो.

विलास शा.गोहणे
9881816588



पशुधन जतनाचा संस्कार

शशिकांत तोटे
दारव्हा,जि.यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

'दिन दिन दिवाळी, गाई म्हशी ओवाळी' हा केवळ वाक्यप्रचार नव्हे तर भारतीय संस्कृती होय. आपल्या भारतीय संस्कृतीतील सण-उत्सवांना केवळ धार्मिक परंपरेचे स्वरूप म्हणून बघणे योग्य नसून, त्यामागे मानवी जीवनमूल्यांची, निसर्गाशी नात्यांची आणि कृतज्ञतेची मोठी शिकवण दडलेली आहे. आज दिवाळीचा पहिला दिवस अर्थात वसुबारस. हा सण म्हणजे केवळ गायीची पूजा करण्याचा दिवस नाही, तर शेती संस्कृतीचा कणा असलेल्या पशुधनाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि त्याच्या संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा दिवस आहे.

भारतीय ग्रामीण जीवनात गाय, बैल आणि इतर पाळीव जनावरांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. पूर्वी शेतीची संपूर्ण व्यवस्था पशुधनाभोवती फिरत होती. बैलांच्या मदतीने शेताची नांगरणी, पेरणी, मळणी आणि मालाची वाहतूक केली जात असे. गायीपासून मिळणारे दूध, दही, तूप यांचा उपयोग केवळ आहारासाठीच नव्हे तर ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही आधार देण्यासाठी होत असे. शेणखतामुळे जमिनीचा कस टिकून राहत होता. त्यामुळे पशुधन हे अमृतासमान होते. पशुधनाच्या ऋणाची जाणीव करून देणारा सण भारतीय संस्कृतीत सण-उत्सवांना केवळ धार्मिक परंपरेचे स्वरूप नाही तर त्यामागे जीवनमूल्यांची, निसर्गाशी नात्याची आणि कृतज्ञतेची मोठी शिकवण दडलेली आहे. दिवाळीचा प्रारंभ वसुबारस या सणाने होतो. हा सण म्हणजे केवळ गायीची पूजा करण्याचा दिवस नाही तर शेतीसंस्कृतीचा कणा असलेल्या पशुधनाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि त्याच्या संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा दिवस आहे.

भारतीय ग्रामीण जीवनात गाय, बैल आणि इतर पाळीव जनावरांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आज काळ बदलला. शेतीमध्ये यांत्रिकीकरण आले. ट्रॅक्टर, आधुनिक अवजारे आणि रासायनिक खतांच्या वापरामुळे पारंपरिक पशुधनाचे महत्त्व काही प्रमाणात कमी झाले. मात्र, त्याचे महत्त्व संपलेले नाही. आज दुध व्यवसाय हा लाखो ग्रामीण कुटुंबाच्या अर्थजनाचा महत्त्वाचा आधार आहे. शेतीपूरक व्यवसाय म्हणून पशुपालन ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देत आहे; परंतु दुर्दैवाने आज पशुधनासमोर अनेक संकटे उभी आहेत. दुष्काळी परिस्थितीमुळे चाऱ्यांची टंचाई, पाण्याचे दुर्भिक्ष, वाढता पशुखाद्याचा खर्च,जनावरांचे आजार आणि पशुवैद्यकीय सुविधांच्या अभावामुळे पशुपालन अडचणीत आहे. अनेकदा आर्थिक अडचणीमुळे जनावरांची योग्य काळजी घेणे शक्य होत नाही. भाकड जनावरांकडे दुर्लक्ष करणे, त्यांना मोकाट सोडणे आणि गोवंशांच्या संगोपनाकडे पाठ फिरवणेदेखील चिंतेची बाब आहे. आजची वसुबारस साजरी करत असताना या वास्तवाकडे डोळेझाक करून चालणार नाही. केवळ गायीची आरती किंवा तिचे पूजन करून पशुधनाविषयी कर्तव्य पूर्ण होत नाही. जनावरांना पुरेसा चारा, स्वच्छ पाणी, निवारा, वेळोवेळी उपचार आणि कायदेशीर सुरक्षितता उपलब्ध करून देणे ही वसुबारस्याची खरी पूजा आहे. त्यात शासनाने ही आर्थिक मदतीवर भर देणे जरुरी आहे. वसुबारस हा सण माणसाला उपकरांची जाणीव करून देतो. आपल्या जगण्याला समृद्ध करणाऱ्या पशुधनाला विसरता कामा नये. पशुधनाचे संवर्धन म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे संवर्धन, म्हणजे शेतीसंस्कृतीचे संरक्षण होय. आजच्या दिवाळीच्या पहिल्या दिवशी उजळणारी पणती केवळ घरात प्रकाश न आणता पशुधनाच्या जीवनातही सुरक्षितता, संवेदना आणि सन्मानाचा प्रकाश निर्माण करणारी ठरावी. हीच वसुबारसेची खरी शिकवण होय.

वसुबारस : गोमातेप्रति कृतज्ञता व्यक्त करणारा सण

भारतीय संस्कृतीत गायीला केवळ एक प्राणी न मानता तिचे 'गोमाता' म्हणून पूजन केले गेले आहे. गायीचे रक्षण, तिचे संवर्धन आणि गोवंशाचे महात्म्य जपल्याने निसर्गाचा समतोल राखला जातो, म्हणूनच आजच्या आधुनिक काळात चालणाऱ्या गोरक्षणाच्या चळवळी आपल्या समृद्ध परंपरेचीच साक्ष देतात. यंदा गुरुवार ५ नोव्हेंबर या दिवशी वसुबारस हा सण आहे. गोवंशाप्रति कृतज्ञता व्यक्त करणारा आणि मानवाला निसर्गाच्या निकट घेऊन जाणारा सण आहे.

महत्व आश्विन वद्य द्वादशी या दिवशी वसुबारस तसेच गुरुद्वादशी हे सण साजरे केले जातात. वसुबारस हा दिवस दिवाळीला जोडून येतो, म्हणून त्याचा समावेश दिवाळीत केला जातो; पण वस्तुतः हा सण वेगळा आहे.

या दिवशी विष्णुलोकातील वासवदत्ता नामक कामधेनू श्रीविष्णूच्या लहरींचे वहन ब्रह्मांडापर्यंत करण्यासाठी अविरत कार्य करते. या दिवशी या कामधेनूचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून अंगणात तुळशीवृंदावनाशी धेनू म्हणजेच गाय उभी करून तिचे प्रतीकात्मक रूपात पूजन केले जाते.

या दिवशी आपल्या अंगणातील गायीला वासवदत्तेचे स्वरूप प्राप्त होते, म्हणजेच तिचे एकप्रकारे बारसे होऊन तिला देवत्व प्राप्त होते. यासाठीच या दिवसाला वसुबारस असे म्हणतात. बारस म्हणजे एखाद्या गोष्टीत नवीन चैतन्यबीजाची निर्मिती होणे. हेच देवत्व तिच्या ठायी कायमस्वरूपी आहे हा भाव ठेवल्यास तिच्यातून प्रक्षेपित होणाऱ्या चैतन्यलहरींचा लाभ



असतो.

इतिहास समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या, अशी कथा आहे. त्यातल्या नंदा नावाच्या धेनूला उद्देशून हे व्रत आहे. या व पुढील अनेक जन्मांतील कामना पूर्ण व्हाव्यात आणि पूजा करत असलेल्या गायीच्या शरीरावर जितके केस आहेत, तितकी वर्षे स्वर्गात रहायला मिळावे. या उद्देशाने हा सण साजरा करतात.

सण साजरा करण्याची पद्धत या दिवशी सौभाग्यवती स्त्रिया एकभुक्त राहून सकाळी अथवा सायंकाळी सवत्स गायीची पूजा करतात. वसुबारस हा सण केवळ एक धार्मिक विधी नसून तो आपल्या संस्कृतीचा, गोधनाचा आणि निसर्गाचा समतोल राखणारा एक कृतज्ञता सोहळा आहे. सवत्स गायीचे पूजन करून आपण गोवंशाचे रक्षण आणि संवर्धन करण्याचा संकल्प करतो, ज्यामुळे आपल्या जीवनात सुख, समृद्धी आणि चैतन्य निर्माण होते.

गोवंशाचे रक्षण ही काळाची आवश्यकता

आजच्या काळात वाढते शहरीकरण, शेतीतील यांत्रिकीकरण आणि बदलती जीवनशैली यामुळे गोवंशाचे महत्त्व हळूहळू दुर्लक्षित होत आहे. गायीचे दूध, शेण आणि गोमूत्र यांचा शेतीसह विविध क्षेत्रांत उपयोग होतो. पारंपरिक शेतीपद्धतीमध्येही गोधनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे गोवंशाचे संवर्धन करणे ही केवळ धार्मिक श्रद्धेची बाब नसून ती पर्यावरणाचे संतुलन आणि आपल्या पारंपरिक जीवनपद्धतीचे जतन करण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाची गोष्ट आहे.

संकल्प वसुबारसच्या निमित्ताने केवळ एका दिवसापुरते गायीचे पूजन न करता वर्षभर तिच्याप्रति कृतज्ञतेचा भाव ठेवणे आवश्यक आहे. गोवंशाची उपेक्षा न करता त्यांची काळजी घेणे, गोशाळांना शक्य ते सहकार्य करणे, गोवंशाची अवहेलना होणार नाही, याची दक्षता घेणे आणि पुढील पिढीला गोमातेचे धार्मिक, सांस्कृतिक अन् पर्यावरणीय महत्त्व समजावून सांगणे, हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. हिंदू संस्कृती विविध व्रते, सण आणि उत्सवाच्या माध्यमातून निसर्गाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याची शिकवण देते.

वसुबारसच्या निमित्ताने कृतज्ञतेच्या भाव कृतीत उतरवून गोमातेचे रक्षण आणि संवर्धनातून निसर्गाचे संतुलन राखण्याचा संकल्प करूया!

सुनीता खाडे
यवतमाळ 9970752507

भुताच्या शोधासाठी फ्रान्सिस हॅल्झेन या शास्त्रज्ञाला नोबेल पुरस्कार!

भूत दिसत नाही, स्पर्श करता येत नाही... पण न्यूट्रिनो मात्र विज्ञानाने शोधून दाखवला!

भुतांच्या गोष्टी ऐकल्या, भुतांचे चित्रपट पाहिले, एखाद्या निर्जन वाड्यात भूत असल्याच्या कहाण्याही ऐकल्या असतील. काहींनी तर भूत पाहिल्याचा दावाही केला असेल! भूत असते, पण ते दिसत नाही, त्याला स्पर्श करता येत नाही, ते अचानक येते आणि अदृश्य होते, अशी एक कल्पना समाजात अनेक वर्षांपासून रुजलेली आहे.

चित्रपट, मालिका, लोककथा आणि काही भोंदूबाबांच्या कथित चमत्कारांमुळे या कल्पनेला आणखी खतपाणी मिळत असते. भूतबाधा, भानामती, करणी, चेटूक अशा गोष्टींच्या नावाखाली अनेकदा सामान्य माणसांच्या भीतीचा बाजारही मांडला जातो, पण जरा थांबा! भुतांच्या या अदृश्य दुनियेचा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे विज्ञानाच्या जगात नुकतीच घडलेली एक भन्नाट घटना! २०२६ चा भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार प्रा. फ्रान्सिस हॅल्झेन (Francis Halzen) यांना मिळाला आहे. आता तुम्ही म्हणाल, त्यांनी नेमके कोणते भूत पकडले? तर त्यांनी कोणत्याही वाड्यातील, स्मशानातील किंवा झाडावरच्या भुताचा शोध लावलेला नाही. त्यांनी शोध घेतला आहे, तो ब्रह्मांडात मुक्तपणे संचार करणाऱ्या 'न्यूट्रिनो' (Neutrino) नावाच्या सूक्ष्म कणांचा! या कणांना विज्ञानाच्या भाषेत गंमतीने 'घोस्ट पार्टिकल्स' (Ghost Particles) अर्थात भुतासारखे अदृश्य कण असे संबोधले आहे.

आपल्या समाजात भुताबद्दल एक लोकप्रिय समज आहे. ते अस्तित्वात असते, पण दिसत नाही. त्याला स्पर्श करता येत नाही आणि ते आपल्यातून आरपार जाते, याला चित्रपटातून आणखी खतपाणी घातले जाते, फ्रान्सिस हॅल्झेन यांनी शोध लावलेल्या न्यूट्रिनोचे वैशिष्ट्यही काहीसे याच्याशी मिळतेजुळते आहे. हे अतिशय सूक्ष्म, विद्युतभार नसलेले आणि अत्यंत कमी वस्तुमान असलेले कण आहेत. ते सामान्य पदार्थांशी फारच कमी परस्परसंवाद करतात. त्यामुळे दर सेकंदाला अब्जावधी न्यूट्रिनो आपल्या शरीरातून आरपार जात असतात, पण आपल्याला त्याची कोणतीही जाणीव होत नाही. म्हणूनच



त्यांना 'घोस्ट पार्टिकल्स' असे टोपणनाव दिले आहे .

मात्र, इथे एक महत्त्वाचा फरक समजून घेतला पाहिजे. न्यूट्रिनो हे विज्ञानाने प्रयोगांद्वारे सिद्ध केलेले भौतिक कण आहेत. त्यांचे अस्तित्व मोजता येते, त्यांच्या हालचालींचा अभ्यास करता येतो आणि योग्य उपकरणांच्या साहाय्याने त्यांना शोधताही येते. याउलट भुतांच्या अस्तित्वाला आजपर्यंत विश्वसनीय आणि पुनरावृत्ती करता येण्याजोगा वैज्ञानिक पुरावा मिळालेला नाही. म्हणजेच, न्यूट्रिनो हे खरे, पण त्याच्या नावातील भूत हा केवळ उपमेचा भाग आहे!

प्रा. फ्रान्सिस हॅल्झेन यांनी १९८८ मध्ये एक आगळीवेगळी कल्पना मांडली. दक्षिण ध्रुवावरील खोल आणि स्वच्छ बर्फामध्ये न्यूट्रिनो शोधण्यासाठी प्रचंड मोठी प्रयोगशाळा उभारता येईल, असा त्यांचा विचार होता.

या कल्पनेतून पुढे 'आइसक्यूब न्यूट्रिनो ऑब्झर्व्हेटरी' (IceCube Neutrino Observatory) ही अद्भुत वैज्ञानिक वेधशाळा उभी राहिली.

अंटार्क्टिकाच्या बर्फामध्ये सुमारे एक घन किलोमीटर क्षेत्रात हजारो प्रकाशसंवेदक बसवण्यात आले आहेत. न्यूट्रिनो एखाद्या अणुकेंद्राशी क्वचितच टक्कर घेतो. अशा वेळी निर्माण होणाऱ्या क्षीण प्रकाशाचा मागोवा हे सेन्सर्स घेतात आणि त्यावरून त्या अदृश्य कणाचा शोध लावला जातो.

म्हणजे भूत शोधण्यासाठी मांत्रिक, लिंबू, नारळ, राख किंवा अंगारा लागत नाही, तर लागतात अत्याधुनिक उपकरणे, गणित, भौतिकशास्त्र आणि अनेक वर्षांचे संशोधन!

याच संशोधनातील निर्णायक योगदानाबद्दल फ्रान्सिस हॅल्झेन यांना २०२६ चा नोबेल पुरस्कार नुकतेच ओक्टोबर महिन्यात देण्यात आला. त्यांच्या संशोधनामुळे विश्वातील अतिऊर्जावान घटनांचा अभ्यास करण्यासाठी विज्ञानाला एक नवी खिडकी खुली झाली आहे.

मग खरे भूत कोणाचे? विज्ञानाचे की अंधश्रद्धेचे?

आता थोडा विचार करूया.

एखाद्या निर्जन घरात आवाज आला. झाडाची सावली हलली, रात्री एखादा विचित्र प्रकाश दिसला किंवा कुणाला अनोखा अनुभव आला, तर लगेच त्याला भूताचे नाव देण्याची घाई कशासाठी?

त्या घटनेमागे नैसर्गिक, पर्यावरणीय, भौतिक किंवा मानसिक कारण असू शकते का, याचा शोध घेणे अधिक महत्त्वाचे नाही का?

भुतांच्या गोष्टी सांगणारे चित्रपट मनोरंजनासाठी असतात. त्यातील दृश्ये, ध्वनी आणि प्रसंग हे प्रेक्षकांच्या मनात भीती निर्माण करण्यासाठी रचलेले असतात; परंतु चित्रपटातील कल्पनांना वास्तव समजणे किंवा एखाद्या भोंदू बाबाच्या दाव्याला वैज्ञानिक सत्य मानणे योग्य नाही.

अंधश्रद्धेचा सर्वांत मोठा फायदा कोणाला होतो? तर लोकांच्या भीतीवर आपली दुकानदारी चालवणाऱ्यांना! जिथे प्रश्न विचारण्याची सवय संपते, तिथे अंधश्रद्धेला सुरुवात होते आणि जिथे पुरावा मागण्याची हिंमत निर्माण होते, तिथे विज्ञान जन्माला येते. अदृश्य म्हणजे अलौकिक नव्हे!

या संपूर्ण विषयातून एक महत्त्वाचा बोध घेण्यासारखा आहे. आपल्या डोळ्यांना दिसत नाही म्हणून एखादी गोष्ट अस्तित्वात नाही, असे म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे एखादी गोष्ट दिसत नाही म्हणून ती भूत, चमत्कार किंवा अलौकिक शक्ती आहे, असेही मानता येत नाही.

हवा दिसत नाही, पण तिचे अस्तित्व आपल्याला माहीत आहे. गुरुत्वाकर्षण दिसत नाही, पण त्याचा परिणाम अनुभवता येतो. रेडिओ लहरी दिसत नाहीत, पण त्यांच्यामुळे आपण जगाशी जोडले जातो आणि न्यूट्रिनो तर आपल्या शरीरातून आरपार जात असूनही आपल्याला त्याची जाणीव होत नाही.

म्हणूनच प्रत्येक अदृश्य गोष्टीला भूत समजण्याऐवजी तिच्यामागील विज्ञान समजून घेण्याची गरज आहे. भूत आहे की नाही, या चर्चेपेक्षा भुताच्या नावाखाली समाजात निर्माण होणारी भीती, अंधश्रद्धा आणि आर्थिक शोषण संपवणे अधिक महत्त्वाचे आहे.

शेवटी एवढेच...

भूत शोधण्याच्या नादात आयुष्य घालवण्यापेक्षा विज्ञानाच्या मदतीने ब्रह्मांडातील अदृश्य कण शोधणे केव्हाही अधिक उपयुक्त! फ्रान्सिस हॅल्झेन यांनी दक्षिण ध्रुवाच्या बर्फात न्यूट्रिनोचा शोध लावला आता आपण आपल्या समाजातील अंधश्रद्धेच्या अंधाराचा माग काढायला हवा.

कारण विज्ञानाचे खरे सामर्थ्य केवळ अदृश्य कण शोधण्यात नाही, तर माणसाच्या मनातील अज्ञानाचा अंधार दूर करण्यात आहे! भूत दिसत नाही म्हणून त्यावर विश्वास ठेवायचा की न्यूट्रिनो दिसत नाही म्हणून त्याचा वैज्ञानिक शोध घ्यायचा, हा फरक समजून घेणे म्हणजेच वैज्ञानिक दृष्टिकोन!

मनोज पवार
यवतमाळ
९४२२८६५८१०

टिप : या लेखांमध्ये प्रकाशित होणारी मते लेखकांची आहे. त्याच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

थोडक्यात

महिला विद्यालयांमध्ये पर्यावरणपूरक निर्माल्यकलश उपक्रम



यवतमाळ : १४ ऑक्टोबर रोजी शिशू विहार मंडळांतर्गत महिला विद्यालयात हरितसेनेंतर्गत पर्यावरणपूरक निर्माल्यकलश उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींनी पर्यावरणपूरक निर्माल्यकलश तयार केला. यावेळी विविध दुर्गादेवी मंडळांना भेट देऊन त्यांना निर्माल्याचे पावित्र्य समजावून सांगितले. या निर्माल्याचे झाडांना उपयोगी होईल असे खत कसे तयार करू शकतो व योग्यरीत्या निर्माल्याचा पर्यावरणपूरक कसा उपयोग करता येईल, याबद्दल माहिती सांगितली. या उपक्रमाला हरित सेनेचे प्रमुख सुशांत भाके यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या उपक्रमात वर्ग ९ ब च्या विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदविला. विद्यालयातील शिक्षक प्रवीण जोशी, पंढरी मुळे, अमित मूलकर, सुशांत भाके यांनी विद्यार्थिनींसह रॅली काढून विविध दुर्गादेवी मंडळांना भेटी देऊन पर्यावरणपूरक निर्माल्यकलश उपक्रमामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी



यवतमाळ : येथील स्थानिक महिला विद्यालय उच्च व उच्च माध्यमिक विद्यालय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी उत्साहामध्ये संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला विद्यालयाच्या व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री उपाध्ये उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून रेखा कुडमते उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन प्रदीप भोजने यांनी केले. आभार राहुल ढोणे यांनी मानले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंतांच्या प्रतिमेच्या पूजन आणि द्वीपप्रज्वलनाने झाली. प्रथम संकल्प गीत घेतल्यानंतर राष्ट्रसंतांच्या कार्यावर प्रकाश टाकताना प्रदीप भोजने यांनी महाराष्ट्रातील इतर संत व राष्ट्रसंत यांच्या कामगिरीचा आढावा घेतला. त्यांनी सामुदायिक प्रार्थनेचे महत्त्व भाषणातून विद्यार्थ्यांना पटवून दिले. राष्ट्रसंतांची ग्रामस्वराज्याची संकल्पना विद्यार्थ्यांना समजून सांगितली. त्याचप्रमाणे भूदान चळवळ आणि भारतीय स्वातंत्र्यामध्ये राष्ट्रसंतांचा कार्याबद्दल विस्तृतपणे विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रवंदनेने करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी निरव शांततेत मौन श्रद्धांजली घेऊन अध्यक्षाच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता झाली.

विशेष उपचार पद्धतीने मूळव्याध व भगंदर चिकित्सा शिबिर



यवतमाळ : गुप्ता हॉस्पिटल व श्रीदत्त हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटरच्या संयुक्त विद्यमाने २४ व २५ ऑक्टोबर रोजी दोनदिवसीय मूळव्याध व भगंदर चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध मूळव्याध व भगंदर तज्ज्ञ डॉ. आलोक मोहनलाल गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली आयोजित शिबिरात १७ रुग्णांवर विशेष सवलतीच्या दरात उपचार करण्यात आले. शिबिरात लेझर उपचारासोबतच डॉ. आलोक गुप्ता यांच्या नव्या आंतरराष्ट्रीय पेटंटप्राप्त उपचार पद्धतीने मूळव्याधीवर उपचार करण्यात आले. या विशेष पद्धतीमध्ये कोणतीही चिरफाड न करता मूळव्याधीच्या मुळांचे उच्चाटन केले जाते. तसेच मलविसर्जनाच्या वेळी येणारा अडथळा (ODS-Obstructive Defecation Syndrome) दूर करण्यासही मदत होते. या उपचार पद्धतीमुळे मूळव्याध पुन्हा होण्याची शक्यता अत्यंत कमी असल्याचे सांगण्यात आले. भगंदर रुग्णांवरही लेझर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपचार करण्यात आले. या पद्धतीने मोठ्या आकाराचे तसेच अनेक छिद्रे असलेल्या जटिल भगंदरावरही उपचार करणे शक्य झाले. त्यामुळे रुग्णांना वारंवार रुग्णालयात येण्याची आवश्यकता कमी होते. तसेच मलविसर्जनावरील नियंत्रण कायम राखण्यास मदत होते. या पद्धतीमध्ये वेदनाही तुलनेने कमी होतात आणि आजार पुन्हा उद्भवण्याची शक्यता कमी असते. उद्घाटनप्रसंगी इतर डॉक्टरांची उपस्थिती शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी नीमाचे अध्यक्ष डॉ. विजय अग्रवाल, महाराष्ट्र राज्य नीमाचे उपाध्यक्ष डॉ. मंगेश हातगावकर, श्रीदत्त हॉस्पिटलचे संचालक डॉ. सतीश विडे, नीमा सेंट्रलचे कायदेशीर सल्लागार डॉ. नितीन कोटके, नीमा आयुर्वेद फोरमचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश जयस्वाल, नीमा राज्य शाखेचे प्रतिनिधी डॉ. प्रवीण रामुडे, प्रसिद्ध भूलतज्ज्ञ डॉ. शिवल मानकर, डॉ. अर्चना प्रागृत, डॉ. अशोक गुप्ता, डॉ. अमोल गुप्ता आणि डॉ. रिचा गुप्ता उपस्थित होते. शिबिर यशस्वीतेसाठी गुप्ता हॉस्पिटल ॲण्ड लेझर सेंटर येथील कर्मचारीवृंद तसेच श्रीदत्त हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

कर्जमुक्ती शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करावे: जिल्हाधिकारी

यवतमाळ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ या योजनेच्या पात्र लाभार्थींच्या आधार प्रमाणिकरणासाठीच्या ४ याद्या पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आल्या आहे. तथापि, योजनेच्या यादीत नाव आलेल्या २२ हजार ४९१ पात्र लाभार्थींनी अद्यापही त्यांचे आधार प्रमाणिकरण केले नाही. विशिष्ट क्रमांकाच्या याद्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या सर्व शाखा, राष्ट्रीयीकृत बँकांच्या सर्व शाखा, सर्व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था व सहकार अधिकारी श्रेणी-१ तालुका यांचे कार्यालयात लावण्यात आल्या आहेत. सबब या योजनेस सर्व पात्र शेतकऱ्यांनी त्यांचे नाव कर्जमुक्ती योजनेच्या यादीमध्ये असल्याची खात्री करून नावासमोरील विशिष्ट क्र., बँकेचे पासबुक, आधार कार्ड, आधार कार्डशी संलग्न मोबाईल यासह जवळचे सेतू सुविधा केंद्रावर जाऊन त्वरित आधार प्रमाणिकरण ई-केवायसी करून कर्जमुक्तीचा लाभ घ्यावा.

६७४ विशेषज्ञांसह ७६६ एमबीबीएस डॉक्टरांचा समावेश

आरोग्यसेवेला बुस्टर डोस

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : राज्यातील जनतेला, विशेषतः ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागातील नागरिकांना दर्जेदार व वेळेवर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने वैद्यकीय अधिकारी भरतीला प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (एस-२०) संवर्गातील एक हजार ४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती आदेश वितरित करण्याचा विशेष समारंभ ४ नोव्हेंबरला मुंबईतील नरीमन पॉर्इंटवरील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये पार पडला. त्यामुळे आरोग्यसेवेला नवा बुस्टर डोस मिळाला आहे.

यामध्ये ६७४ विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि ७६६ एमबीबीएस वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या नियुक्त्यांमुळे राज्याच्या आरोग्य यंत्रणेला मोठे मनुष्यबळ मिळणार आहे. सोबतच शासकीय रुग्णालयांमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता दूर करण्यास मदत होणार आहे. राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख करण्यासाठी शासनाने रिक्तपदे भरण्याला प्राधान्य दिले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची उपलब्धता वाढविणे ही काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना किरकोळ आजारांपासून गंभीर आजारांपर्यंतच्या उपचारांसाठी मोठ्या शहरांमध्ये धाव घ्यावी लागू नये, तसेच आपत्कालीन परिस्थितीत तातडीने वैद्यकीय मदत मिळून ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी ही भरती महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

६७४ विशेषज्ञांसह ७६६ डॉक्टरांची नियुक्ती

राज्यातील वैद्यकीय अधिकारी संवर्गातील एकूण दोन हजार ६१४ पदांपैकी एक हजार ४४० पदांसाठी २७ फेब्रुवारी रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या भरती प्रक्रियेत ६७४ विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि ७६६ एमबीबीएस वैद्यकीय अधिकारी अशा एकूण एक हजार ४४० पदांचा समावेश आहे.

नियमित रुग्णसेवा होणार सुरळीत

विशेषज्ञ डॉक्टरांच्या नियुक्त्यांमुळे ग्रामीण रुग्णालयांपासून जिल्हा रुग्णालयांपर्यंत विविध विशेषज्ञ उपचार सेवा उपलब्ध करून देण्यास बळ मिळेल. एमबीबीएस वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमुळे प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि इतर शासकीय आरोग्य संस्थांमधील नियमित रुग्णसेवा अधिक सक्षम होण्यास मदत होईल. यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील रुग्णांना दिलासा मिळेल. या नियुक्त्यांचा सर्वाधिक फायदा ग्रामीण, दुर्गम, डोंगराळ आणि आदिवासी भागातील नागरिकांना होणार आहे.

संसर्ग व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण

अनेक ठिकाणी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांना उपचारांसाठी दूरच्या शहरांमध्ये जावे लागते. डॉक्टरांची उपलब्धता वाढल्याने स्थानिक पातळीवरच तपासणी, निदान आणि उपचार मिळण्यास मदत होईल. अपघात, प्रसूती, सर्पदंश, संसर्गजन्य आजार तसेच अन्य वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितींमध्ये वेळेवर उपचार मिळणे शक्य होईल. माता व बाल आरोग्य सेवा, नियमित आरोग्य तपासणी, संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य आजारांचे निदान व उपचार अशा विविध सेवांना अधिक गती मिळेल.

रुग्णकेंद्रित दृष्टिकोन ठेवा : ना. आबिटकर

राज्यातील गरीब, गरजू आणि ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा जवळच उपलब्ध व्हावी, हा शासनाचा प्राधान्यक्रम आहे. एक हजार ४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमुळे शासकीय आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम होऊन ग्रामीण जनतेला वेळेवर उपचार मिळण्यास मदत होईल. नवनियुक्त डॉक्टरांनी सेवाभाव आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोन ठेवून काम करावे, असे आवाहन राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दै. लोकसूत्रशी बोलताना केले.

उत्पन्नवाढीसाठी माती परीक्षण करणे आवश्यक

लोकसूत्र प्रतिनिधी

शेतजमिनीचे आरोग्य जपण्याचा कृषी विभागाचा सल्ला

यवतमाळ : अधिक उत्पन्नाच्या हव्यासापोटी रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा बेसुमार वापर वाढल्यामुळे शेतजमिनीची पोत दिवसेंदिवस खालावत चालली आहे. मानवी शरीरात काही त्रास झाल्यास आपण लगेच डॉक्टरकडे धाव घेतो; परंतु शेतजमिनीची सुपिकता नष्ट होत असताना त्याकडे दुर्लक्ष केले जाते. तेव्हा शेतकऱ्यांनी किमान दर तीन वर्षांनी माती परीक्षण करून घ्यावे, असा सल्ला तालुका कृषी अधिकारी आडे यांनी दिला आहे. रासायनिक खताचा अतिरेक आणि असंतुलित वापर झाल्यामुळे जमिनीची सुपिकता धोक्यात आली आहे. ज्या जमिनीत अशा खतांचा अतीवापर होतो, तिथे पिकांवर कीटक आणि रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता जास्त असते. सेंद्रिय खते, शेणखत आणि हिरवळीच्या खतांचा वापर कमी झाल्याने ही समस्या अधिक गंभीर बनली आहे. शेतजमिनीतील पोषक घटकांची कमतरता किंवा दोष शोधण्यासाठी माती परीक्षण केले जाते. जमिनीमध्ये नत्र, स्फुरद, पालाश, कॅल्शियम, मॅग्नेशियम, सल्फर, लोह, जस्त यासारखे घटक पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असतात. माती परीक्षणामुळे जमिनीत कोणत्या घटकाची कमतरता आहे आणि पिकासाठी कोणते खत किती प्रमाणात वापरावे, याची अचूक माहिती मिळते. मातीचे नमुने प्रयोगशाळेला दिल्यानंतर साधारणतः एक महिन्यात त्याचा सविस्तर अहवाल प्राप्त होतो. या अहवालानुसार खतांची योग्य नियोजन करून शेतकरी अनावश्यक खर्च टाळू शकतात. दर तीन वर्षांनी शेतजमिनीचे माती परीक्षण करून घेणे हे जमिनीच्या सुपिकतेसाठी महत्त्वाचे आहे. आपल्याला आपल्या जमिनीतून भरघोस उत्पादन घ्यावयाचे असेल तर आपण माती परीक्षण करून घ्यावे आणि ज्या घटक द्रव्याची कमतरता आहे, ती कमतरता दूर करावी. कोणतेही खत किंवा औषध टाकल्या गेली तर काही रसायन जमिनीत अतिरिक्त होऊन जमिनीचा पोत घसरतो. पोषक द्रव्य कमी होतात. यामुळे भरघोस पीक हाती येत नाही. यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होते. अशी माहिती तालुका कृषी अधिकारी आडे यांनी दिली.

ग्राहकांच्या वीजबिलात तिप्पट वाढ

लोकसूत्र प्रतिनिधी

स्मार्ट मीटरच्या नावाखाली ग्राहकांचा आरोप

यवतमाळ : जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वीज वितरण कार्यालयाच्या माध्यमातून स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे. ज्या ग्राहकांना स्मार्ट वीज मीटर बसवायचे नाही, असे सांगितल्यानंतरही वीज वितरण कार्यालय जबरदस्तीने वीज मीटर बसवीत असल्याचा आरोप केल्या जात आहे. ज्यांच्याकडे मीटर बसविण्यात आली, त्यांच्याकडे आता वीजबिल तिप्पट आल्याची तक्रार अनेकांनी केली आहे.

ग्राहकांनी स्मार्ट मीटर मागितल्याशिवाय त्यांच्या घरात कोणीही मीटर लावू नये, असा न्यायालयाचा आदेश आहे. मात्र, या आदेशाला न जुमानता अनेक ठिकाणी वीज वितरण कार्यालयाचे कर्मचारी मीटर लावत असल्याचे दिसून येत आहे. याबाबत अनेक ग्राहकांनी वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष तसेच नगरपरिषदेचे विरोधी पक्ष गटनेते डॉ.नीरज वाघमारे यांच्याकडे तक्रारी दिल्या आहेत. त्यांनी या तक्रारीची दखल घेत वीज वितरण कार्यालयाचे कार्यकारी अभियंता पुरुषोत्तम चव्हाण यांनाही याबाबत सूचित केले.

ज्या ग्राहकांना सुरुवातीला ५०० ते ७०० रुपये बिल येत होते, आता १२०० ते १५०० वर पोहोचले आहे. अवाजवी बिल येत असल्याने ग्राहकांनी वीज वितरण कार्यालयाकडे तक्रारीही नोंदविल्या आहे. मात्र, त्यांच्या तक्रारीची दखल पाहिजे त्या प्रमाणात अद्यापही घेण्यात आली नाही. त्यामुळे ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.



वाढीव बिलाच्या या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून ग्राहकांना प्रत्यक्ष वीज वापरानुसार अचूक बिल देण्याची मागणी करण्यात आली आहे. वीज वितरण कार्यालयाने या संदर्भात ग्राहकांना दिलासा मिळेल या दिशेने काम करावे, अशी मागणी वाघमारे यांनी केली आहे.

आत्मपरीक्षण करूनच करिअरची निवड करा

लोकसूत्र प्रतिनिधी



यवतमाळ: विद्यार्थ्यांनी १२ नंतर करिअरची निवड करताना केवळ इतरांचे अनुकरण न करता स्वतःच्या आवडी, क्षमता, कौशल्ये, अभिरुची आणि व्यक्तिमत्त्वाचे आत्मपरीक्षण करूनच योग्य करिअरची निवड करावी, असे प्रतिपादन प्रा. डॉ. संजय राचलवार यांनी केले.

स्व. रामाजी चन्नावार कनिष्ठ महाविद्यालयात ३० आक्टोबर रोजी विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या १२ वीनंतरच्या करिअर संधी या विषयावरील करिअर मार्गदर्शन कार्यशाळेत ते प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या अपर्णा कोलतेवार होत्या. प्रा. डॉ. संजय राचलवार यांनी विद्यार्थ्यांना १२ वीनंतर उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांची आणि रोजगाराच्या संधींची सविस्तर माहिती दिली. कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमधील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणारे पारंपरिक तसेच आधुनिक करिअरचे पर्याय, व्यावसायिक अभ्यासक्रम, कौशल्याधारित शिक्षण, स्पर्धा परीक्षा, स्वयंरोजगार आणि उद्योजकता याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

करिअर निवडताना केवळ जास्त पगार किंवा सामाजिक प्रतिष्ठा यांचा विचार न करता स्वतःची आवड, आर्थिक परिस्थिती, शैक्षणिक क्षमता आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी यांचा समतोल विचार करणे आवश्यक आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात कौशल्यविकास, डिजिटल ज्ञान, संवादकौशल्य आणि सातत्यपूर्ण अध्ययन यांना विशेष महत्त्व असल्याचेही त्यांनी सांगितले. योग्यवेळी योग्य निर्णय घेतल्यास विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात यशस्वी करिअर घडविता येते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय कार्यशाळा समन्वयक प्रा. गीतांजली मानेकर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. कुणाल पेटकर यांनी केले, तर आभार प्रा. सोनल मावंडे यांनी मानले. यशस्वितेसाठी विजय कुचेवार व वैभव सरोदे यांनी सहकार्य केले.

कार्यशाळेला महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना १२ वीनंतरच्या विविध शैक्षणिक व व्यावसायिक संधींची माहिती मिळाल्याने ही कार्यशाळा मार्गदर्शक व उपयुक्त ठरली.

अर्थशास्त्र विभागाचा अभ्यासदौरा उत्साहात



लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालयतील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने ३१ ऑक्टोबर रोजी रेमण्ड कारखान्याला अभ्यास भेट देण्यात आली. या अभ्यासदौऱ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना औद्योगिक उत्पादन प्रक्रिया, कारखान्याचे व्यवस्थापन, रोजगारनिर्मिती, उत्पादन खर्च तसेच उद्योगाच्या आर्थिक कार्यप्रणालीची प्रत्यक्ष माहिती मिळाली.

या प्रसंगी अक्षय शहादे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी कारखान्यातील विविध उत्पादन प्रक्रिया, यंत्रसामुग्रीचा वापर, कामगारांचे योगदान, औद्योगिक व्यवस्थापन आणि उद्योग क्षेत्रातील रोजगाराच्या संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. प्रत्यक्ष औद्योगिक वातावरणाचा अनुभव घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना अर्थशास्त्रातील सैद्धांतिक ज्ञान आणि व्यावहारिक जीवनातील औद्योगिक व्यवहार याचा संबंध समजून घेण्यास मदत झाली.

प्राचार्य डॉ. जयंत चतुर यांच्या सहकार्य व मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संजय राचलवार यांनी या अभ्यासदौऱ्याचे आयोजन केले. उपक्रमासाठी प्रा. डॉ. रश्मी गजरे यांचे सहकार्य लाभले. अशा अभ्यासदौऱ्यांमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्यासोबतच औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळतो आणि भविष्यातील रोजगार व करिअरच्या संधीबाबत त्यांची जाणीव अधिक व्यापक होते.

गोशाळांमधील पशुधनाच्या चाऱ्यासाठी प्रतिदिन १०० रुपये अनुदान द्या!

गोसेवा महासंघाची मागणी; ५१ गोशाळा संचालकांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी आणि गोशाळा संचालकांसमोर पशुधनाच्या चारा व पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील गोशाळांमधील प्रत्येक पशुधनासाठी प्रतिदिन १०० रुपये अनुदान देण्यात यावे, अशी मागणी गोसेवा महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे.

गोसेवा महासंघाचे राजू खंडाळकर यांच्या नेतृत्वाखाली यवतमाळ जिल्ह्यातील ५१ गोशाळांच्या अध्यक्ष, सचिव, संचालक व प्रतिनिधींनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांना निवेदन सादर केले. निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी आणि पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त मंगेश काळे यांच्याकडे हे निवेदन सुपूर्द करण्यात आले.

निवेदनात नमूद केल्यानुसार महाराष्ट्र शासनाने राज्यात दुष्काळ जाहीर केला असला तरी गोशाळा आणि शेतकऱ्यांकडील पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. पावसाचे प्रमाण कमी झाल्याने शेतांमध्ये चारा, कडबा व कुटार उपलब्ध नाही. पडीत जमीन, डोंगर आणि जंगलांमधील चाराही उगवलेला नाही. दुसरीकडे चाऱ्याचे भाव गगनाला भिडले असून, बाजारात चाऱ्याचा पुरेसा साठाही उपलब्ध नाही. त्यामुळे गोशाळांमधील पशुधनाचे संगोपन करणे दिवसेंदिवस कठीण होत आहे.



महाराष्ट्रात शासनाकडे एक हजार १४ गोशाळांची नोंदणी असून, या गोशाळांमधील संपूर्ण पशुधनासाठी चारा व पाण्याकरिता प्रतिदिन प्रतिपशू १०० रुपये अनुदान देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायतस्तरावर प्रत्येक गावात चारा डेपो निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून, स्वतःच्या पशुधनाचा सांभाळ करणेही त्यांना कठीण झाले आहे. परिणामी, काही शेतकरी आपले गोवंश गोशाळांकडे सोपवित आहेत. त्यामुळे गोशाळांमधील पशुधनाची संख्या क्षमतेपेक्षा अधिक झाली आहे. काही शेतकरी उदरनिर्वाहासाठी गोवंश विक्री करीत असून, अशा परिस्थितीत गोवंश कत्तलीसाठी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्रात गोवंश हत्याबंदी कायदा लागू असताना गोवंशाचे संरक्षण करण्यासाठी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे महासंघाने स्पष्ट केले आहे.

याशिवाय विहिरी, बोअरवेल, तलाव आणि धरणांमधील पाण्याची पातळी कमी झाल्याने भविष्यात गोशाळांमधील पशुधनाला पाणी उपलब्ध करून देण्याचेही मोठे आव्हान निर्माण होऊ शकते.

त्यामुळे चारा व पाण्यासाठी प्रतिदिन १०० रुपये अनुदान तातडीने जाहीर करून त्याबाबत शासनादेश काढावा, अशी मागणी करण्यात आली आहे.या निवेदनप्रसंगी सीए निरंजन राठोड, शैलेश देशकर, अमोघ वोरा, विक्की शर्मा, अभिजीत गल्हाने, गोविंद मोर, एम. आर. राठोड, अनिल पांडे, योगेश बाजपेयी, विनोद क्षीरसागर, शंतनू तुरकर, शुभम मोरे, मनोज काळे, अचलिया, डॉ. सुरेश चौधरी, गिरधारीलाल झाझरिया, चंदन खडसे यांच्यासह जिल्ह्यातील विविध गोशाळांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पान १ वरून

'झेडपी'मागे कोर्ट-कचेरीचे ...

लेखी उत्तरे खटला लढणाऱ्या वकिलांना वेळेत उपलब्ध करून द्यायची असतात. प्रत्येक प्रकरणासंदर्भात शासन निर्णय, परिपत्रके, घेतलेले निर्णय वकिलांना उपलब्ध करून द्यायचे असतात. विभागप्रमुखांनी विधीकक्षाच्या विधिज्ञांसोबतही समन्वय राखणे गरजेचे असते. मुळात न्यायालयीन खटल्यांची प्रकरणे सांभाळणारे त्या-त्या विभागातील कारकून, विभागप्रमुख व वकिलांमध्येच संवादाचा अभाव आहे. अनेकदा प्रशासकीय स्तरावर घेतलेले निर्णय किंवा काढलेले आदेश कायदेशीर चौकटीत बसणारे नसतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांसह सामान्य नागरिकही त्या निर्णयाविरुद्ध न्यायालयात दाद मागत असतात. त्यामुळे पॅनलवरील वकिलांनी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागाने घेतलेले निर्णय कसे योग्य आहेत यावर सक्षमपणे बाजू मांडायची असते. मात्र, तसे घडत नसल्याची वस्तूस्थिती आहे.

पीएमश्री शाळेच्या धान्यप्रकरणात ...

धान्याचे प्रकरण गाजते आहे. चौकशी समितीच्या अहवालात मुख्याध्यापक दोषी आढळल्याचे नमूद आहे. याप्रकरणी आता मुख्याध्यापकासह गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या निलंबनाची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. शाळेत मुदबाह्य फोडणीचे मसाले आणि धान्य वापरण्यात येत असल्याचे गाकऱ्यांच्या सतर्कतेने उघडकीस आले. जणू काही विद्यार्थ्यांच्या ताटात विष कालवण्याचा हा प्रकार असूनही शिक्षण विभागासह अन्न व औषध प्रशासन विभाग यांची भूमिका संशयास्पद आहे. आतापर्यंत या प्रकरणी कोणावरही ठोस कारवाई झालेली नाही. विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ करणाऱ्यांना अभय देण्यासारखे आहे.या प्रकरणाचा अहवाल तात्काळ सार्वजनिक करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि मुडाणा येथील शाळेतील धान्याचे नमुने अन्न व औषध विभागाने ताब्यात घेऊन प्रयोगशाळेत तपासावेत, अशी मागणी पालक वर्गातून होत आहे. प्रशासन या प्रकरणी डोळेझाक करणार की जागे होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

'झेडपी'चा कृषी विभाग ...

सुरू आहे. जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या उत्पन्नातून (उत्पन्न/कर वसुलीतून) कृषी विभागासाठी 'सेस फंड' अंतर्गत यंदा २०२६-२७ साठी दोन कोटी ७४ लाख २० हजारांची तरतूद केली आहे. या निधीतून कृषी विभागाच्या फार्मचा शेतसारा व लिलावाच्या जाहिराती खर्च करण्यासाठी २० हजारांची तरतूद आहे. कृषीदिनाच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी दोन लाख ५० हजार, न्यायालयीन खर्चासाठी ५० हजार, शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानावर स्पायरल सेपरेटर पुरविण्यासाठी १० लाख, ३ हेक्टरपर्यंत जमीन कसणाऱ्यांसाठी बियाणे व खतांकरिता एक कोटी, कीटकनाशक फवारणी सुरक्षा कीटसाठी पाच लाख, ७० टक्के अनुदानावर मोटारपंपासाठी ११ लाख, एचडीईपी पाइपसाठी १० लाख, शेतकरी समुहासाठी ट्रॅक्टर पुरविण्याकरिता ८० लाख, जमिनीला तार कुंपणासाठी ५० लाख तर मानवचलित पेरणीयंत्रासाठी पाच लाख अशी तरतूद होती. मात्र, या तरतुदीतील खर्च झाला नसल्याचेही पुढे आले.

जिल्ह्यात बोगस निविष्ठांचा कहर

नियमानुसार मोहीम अधिकाऱ्यांनी बहुतांश वेळ शेतात, गावांमध्ये आणि कृषी केंद्रांच्या तपासणीत घालवणे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्षात परिस्थिती भलतीच आहे. खते व बियाण्यांची लिंकिंग (सक्तीने इतर साहित्य विकणे), दरांपेक्षा जास्त दराने विक्री आणि बनावट कीटकनाशकांच्या विक्रीकडे दुर्लक्ष करून अर्थपूर्ण तडजोडी केल्या जात असल्याचा आरोप आहे.

भरधाव चारचाकीचा टायर फुटल्याने ...

वाहनाचा पुढील भाग चकनाचूर झाला. अपघाताचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच या मार्गाने येजा करणा-या नागरिकांनी तत्काळ मदत कार्य सुरू केले. मात्र तोपर्यंत सुरेश अजमिरे यांचा मृत्यू झाला होता. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.या अपघाताची पोलीस स्टेशनला वृत्त लिहीस्तोवर नोंद झाली नव्हती.

देवस्थानची जमीन कसणाऱ्यांच्या ...

योजनांपासून वंचित राहिला आहे. ही परिस्थिती केवळ प्रशासकीय उदासीनतेचे नव्हे, तर एका गंभीर मानवीय समस्येचे चित्र उभे करणारी आहे. मध्यंतरी २०१७ मध्ये देवस्थान जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा ऑफलाइन लाभ देण्याची सूचना शासनाने केली होती. त्यावेळी मदतही झाली. मात्र, आता मदतीसाठी शासनाने डीबीटी योजना आणली आहे. शेतकऱ्यांचा ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी व त्याचे आधार खाते बँकखात्याशी लिंक असणे अनिवार्य आहे. देवस्थानच्या जमिनीचे ॲग्रीस्टॅक काढता येते. मात्र, शासनाकडून मिळणारी मदत देवस्थानच्या खात्यात जमा होईल. प्रत्यक्ष शेती कसणाऱ्या शेतकऱ्याला लाभ मिळणार नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी अलिकडेच एका व्हीसीमध्ये राज्याच्या मुख्य सचिवांपुढे शेतकऱ्यांची ही अडचण सांगितली. त्यामुळे लवकरच तसा धोरणात्मक निर्णय होण्याची शक्यताही वर्तविली जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांमुळे या शेतकऱ्यांना न्याय मिळण्याची शक्यता आहे.

पथकप्रमुखांचा कारकुनांशी विसंवाद, स्थानिक निधी लेखा विभागातही चिरीमिरीचे प्रताप

दिवाळीच्या तोंडावर झेडपीत 'ऑडिट'ची धामधूम

केशव सवळकर

यवतमाळ : राज्याच्या वित्त विभागाअंतर्गत कार्यरत स्थानिक निधी लेखा विभागाकडून शासकीय विभागांसह जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा व इतर स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या आर्थिक व्यवहार व लेख्यांचे दरवर्षी ऑडिट केले जाते. यंदाही जिल्हा परिषदेत २०२४-२५ च्या ऑडिटची धामधूम सुरू झाली आहे. दरम्यान, काही विभागांना ऑडिट सौम्य करण्यासाठी चिरीमिरीचीही मागणी होत असल्याची कुजबूज जिल्हा परिषदेत वाढली आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या लेखापरीक्षणासाठी मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० हा मूळ इंग्रजकालीन अधिनियम आहे. त्यात वेळोवेळी शासनाने सुधारणा केल्या आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या असंख्य योजना जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायती, नगरपरिषदा व नगरपंचायतीअंतर्गत राबविल्या जातात. त्यानुसार यंदा २०२४-२५ च्या लेखापरीक्षणाबाबत १३ ऑक्टोबरलाच यवतमाळच्या स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाचे सहाय्यक संचालक यांनी जिल्हा परिषदेला पत्र पाठविले होते. या लेखापरीक्षणासाठी पथकप्रमुख म्हणून व्ही. एच. महम्मद, कलेप अश्विन खडसे व श्री. एच. लटये असे तिघांचे पथक निश्चित केले. १४ ऑक्टोबरपासून जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभागात लेखापरीक्षणाचे कामकाज सुरू झाले. त्यासाठी आवश्यक ती संगणक व इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यासह आवश्यक ते सर्व अभिलेखे पथकाला उपलब्ध करून देण्याचे निर्देशही दिले होते. ही सुविधा उपलब्ध करून न दिल्यास कारवाईची जाणीव सहाय्यक संचालकांनी करून दिली होती. नोडल अधिकारी नियुक्त करण्यासह ऑडिटदरम्यान संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या रजा मंजूर करू नये असे बजावले होते. एकंदरीत या ऑडिटदरम्यान चिरीमिरीच्या मागणीचे प्रताप घडत असल्याची कुजबूज झेडपीच्या वर्तुळातून व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे लेखा व त्यावरील नियंत्रण कसे चालावे, या संदर्भात महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मध्ये माहिती आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व ग्रामपंचायत लेखापरीक्षण नियम या कायद्यानुसार ग्रामपंचायतीच्या जमाखर्चाचे हिशोब ठेवणे व लेखापरीक्षण करणे यासाठी नियम आहेत. मात्र, अनेकदा ऑडिटदरम्यान चिरीमिरीचा प्रकार घडत असल्याचीही चर्चा उठत आहे.



स्थानिक निधी विभागातही गोलमाल

अनेकदा आधिच्या वर्षाचे प्रलंबित आक्षेप कागदावरच निकाली काढण्यासाठी किंवा अनियमितता क्षम्य दाखविण्यासाठी लेखापरीक्षकांकडूनही चिरीमिरीचे प्रकार घडतात. गंभीर आर्थिक अफरातफर लपविण्यासह रकमेचा आकडा छोटा दाखविण्यासाठी स्थानिक पातळीवर गत कालखंडात आर्थिक तडजोडीचे प्रकारही यापूर्वी घडले आहेत. पथकाच्या सरबराईसाठीही होणारा खर्च चर्चेचा विषय आहे.

काय असते ऑडिटची प्रक्रिया


लेखापरीक्षणाचा अधिकार हा कलम ६ अन्वये लेखापरीक्षकांना प्राप्त आहे. सहाय्यक संचालकांच्या निर्देशावरून संबंधित संस्थांचे कॅशबूक, बँक पासबूक, करवसुलीचे रेकॉर्ड, इतर कागदपत्रे, योजनांचे अभिलेखे लेखापरीक्षक तपासतात. ऑडिटपूर्वी किमान दोन आठवडे संबंधित संस्थेला नोटीस देणे बंधनकारक असते. भाग-१ मध्ये गंभीर अनियमितता अंतर्भूत असते. कायद्याविरुद्ध केलेले खर्च, महसुलाचे नुकसान, ढोबळ निष्काळजीपणामुळे किंवा भ्रष्टाचारामुळे झालेली हानी, नियमांचे उल्लंघन करून दिलेली कंत्राटे आदींचा समावेश होतो. भाग-२ मध्ये किरकोळ स्वरुपांच्या लेखाजोखांचा विषय येतो.

'त्या' विद्यार्थ्यांची बनावट पावती देऊन फसवणूक

महाविद्यालयाच्या करामतीचे असंख्य प्रताप

कळंब : काँग्रेसच्या सत्तेत एका मोठ्या महिला नेत्याच्या नावाने शहरात उदयास आलेल्या एका महाविद्यालयानें भ्रष्ट मार्गाने पैसे कमवण्याच्या शर्यतीत अव्वल क्रमांक प्राप्त केला आहे.शासनाकडून त्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची फी मिळाली असतानाही धाकधपट करून महाविद्यालयाने त्या विद्यार्थ्यांकडून फी वसुली केली आहे. मात्र फी वसुलीचा पुरावा तक्रार करणाऱ्या कोणालाही मिळू नये म्हणून ऍडमिशन पावतीच्या मागून हस्तलिखित १५ हजार २५० रुपयाची आकडेवारी लिहून दिल्या गेली आहे.

एकंदरीत त्या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसहित शासनाच्या फसवणुकीसाठी ही अनोखी शक्कल लढवली आहे.राळेगाव रोडवरील त्या महाविद्यालयानें शेतकऱ्यांसहित गोरगरीब विद्यार्थ्यांची फसवणूक केली आहे.त्या महाविद्यालयांकडून आम्हीच कसे शेतकऱ्यांच्या मुलांना प्राधान्य देतो याचा दिंडोरा पिटवीला जातो, मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या ठाळूवरचे लोणी खाण्याचे काम या महाविद्यालयाकडून सुरु आहे.महाविद्यालयात अनेक अभ्यासक्रमांना मोफत प्रवेश आहे.त्या संपूर्ण प्रवेशाची फी शासनाकडून महाविद्यालयाला देण्यात येते.मात्र यां महाविद्यालयाने अनेक वर्षापासुन शासन वं विद्यार्थी यांच्याकडून फी च्या नावाखाली पैसे हडप केले आहे.हजारो विद्यार्थ्यांच्या नावावर करोडो रुपये या महाविद्यालयाने स्वतःच्या घशात घातले आहे.एमएससीच्या 'त्या' विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाने १५ हजार फी घेतली,मात्र आपली फी समाज कल्याणकडून आल्याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाल्याने मागील वर्षी त्या महाविद्यालयाच्या काही जागरूक विद्यार्थ्यांनी या गैरप्रकाराची थेट समाजकल्याण व जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली.त्यामुळेत्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने दुसऱ्या वर्षाला मोफत प्रवेश दिला. मात्र पाहिल्या वर्षाची फी महाविद्यालयाने हडप केली.ही फी घेतेवेळी त्यांनाकुठलीही अधिकृत फी घेतल्याची पावती महाविद्यालयाने दिली नसून त्यांच्या प्रवेश पावती च्या मागच्या बाजूने हाताने १५ हजार २५० फी लिहून दिल्या गेली.मात्र समाज कल्याणने केलेल्या चौकशी वेळी महाविद्यालयाने त्याच विद्यार्थ्यांनी हाताने हा आकडा लिहिला असावा असा रडीचा डाव खेळला. एकंदरीत विद्यार्थ्यांकडून पैसे घेऊन त्यांना पक्की पावती देत नसल्याने विद्यार्थी आपबीती सोसत आहे.आपण विद्यार्थ्यांकडून पैसे घेतल्याचा पुरावा कोनालाही सापडू नये यासाठी महाविद्यालयाने हाताने केलेली करामत मोठ्या चर्चेचा विषय ठरत आहे.एकंदरीत शासनाने या लोणीखाऊ, निगरगंठ्ठ महाविद्यालयाचे फी स्ट्रक्चर जाहीर करून महाविद्यालयाच्या दर्शनी भागावर लावावे व शासनाकडून आजवर लाटलेल्या अनुदानाची चौकशी करावी अशी मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे.



गांजा वर नियंत्रण आणल्याने ड्रगला गोळ्याचा पर्याय

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी ऑपरेशन थंड अंतर्गत अमली पदार्थविरोधात कारवाई तीव्र केल्यामुळे शहरातील नशा बाजाराला धक्का बसला आहे. परिणामी, गांजा आणि एमडीच्या किमती वाढल्या असून गुन्हेगारांनी आता नशेसाठी वेगळा पर्याय शोधण्याचे चर्चिल्या जात आहे. मोठा गुन्हा करण्यापूर्वी नशा येणाऱ्या गोळ्यांचा वापर करीत असल्याचे पोलिसांच्या चौकशीत निष्पन्न झाले आहे.

स्थानिक गुन्हे शाखा, शहर पोलीस, अवधूतवाडी पोलीस, याशिवाय जिल्ह्यातील सर्व पोलीस विभागाला पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी अमली पदार्थावर लक्ष ठेवून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी जिल्ह्यातील सर्व पोलीस निरीक्षक यांना हे आदेश प्राप्त झाले आहेत. त्याच अनुषंगाने पोलीस अधीक्षक हे स्वतः जातीने अंमली पदार्थावर लक्ष ठेवून आहेत. ज्या पोलिसांनी अमली पदार्थ पकडल्यानंतर कारवाई केली नाही अशा पोलिसांवर आणि पोलीस अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई अंतर्गत दंड करणे, वाढीव वेतन भत्ता थांबविणे, निलंबनाची कारवाई करणे यासारखी कारवाई सुरू केली आहे. खात्यातील दहापेक्षा अधिक कर्मचाऱ्यांवर अशी कारवाई झाली आहे. स्थानिक गुन्हे शाखेसह सर्व पोलिसांनी गांजा आणि एमडी यांची जोरदार तपासणी सुरू केली आहे. त्यामुळे व्यसनाधीन झालेल्या काही युवकांनी आता आपला मार्ग नशेच्या गोळ्या यांच्याकडे वळिवला आहे. या गोळ्यांबाबत पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून ह्या गोळ्या कुठल्या मेडिकल मधून घेतल्या जातात, की कोणी या गोळ्या मुद्दामून नशेखोरांना पुरवितात, या दिशेने देखील तपास सुरू केला असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांनी दिली.



अँटी डिप्रेशन गोळ्याचा वापर

पोलिसांनी गांजा, एमडी, अमली पदार्थ यांची शोध मोहीम सुरू केल्यानंतर सध्या विक्रेत्यांकडून सावधगिरीने त्याची विक्री होत आहे. तर याचे दरही २० ते ३० टक्क्याने वाढविले असल्याचे आरोपींकडूनच सांगण्यात येत आहे. अमली पदार्थ विकणाऱ्या व्यक्तीला पोलिसांची प्रचंड भीती निर्माण झाली आहे आणि याचे खरे श्रेय पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांना जात असल्याचे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

---

४१ हजार बाधित शेतकऱ्यांना दिलासा, पालकमंत्री संजय राठोड यांचा पाठपुरावा

अतिवृष्टीबाधितांच्या मदतीसाठी ३१.५८ कोटी

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : जिल्ह्यात जून ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून ३१.५८ कोटींची मदत मंजूर झाली आहे. यापैकी शेतीपिकांच्या नुकसानीसाठी ३०.०२ कोटी, तर शेतजमिनीच्या नुकसानीसाठी १.५६ कोटींच्या निधी वितरणास मदत व पुनर्वसन विभागाने २ नोव्हेंबरला मंजुरी दिली आहे.

या मंजूर निधीमुळे जिल्ह्यातील सुमारे ४१ हजार ६२० बाधित शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. बाधित शेतकऱ्यांना नुकसानाची मदत तातडीने मिळावी, यासाठी पालकमंत्री संजय राठोड यांनी शासनस्तरावर पाठपुरावा केला. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यात येणार आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिक व शेतजमिनीच्या नुकसानीबाबत अमरावती विभागातील २ लाख १५ हजार ४९५ बाधित शेतकऱ्यांना सुमारे २०१ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यामध्ये विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा या जिल्ह्यांचा समावेश असून मदतीचा लाभ या जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांना होणार आहे. शासन निर्णयानुसार, शेतीपिकांच्या नुकसानीची मदत थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. शेतजमिनीचे मालक असलेल्या फक्त अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना विहित दराने २ हेक्टरच्या मर्यादेत आहे. चालू हंगामामध्ये यापूर्वी शेतीपिकांच्या नुकसानीकरिता वितरीत केलेल्या मदतीच्या निधीमध्ये या प्रस्तावांतर्गत मागणी केलेल्या निधीचा समावेश नाही याची दक्षता घ्यावी. एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे विहित दराने मदत देण्यात येत असल्याची खात्री करावी. कोणत्याही लाभार्थ्यांना मदत देतांना व्दिरुक्ती होणार नाही याची तहसिलदारांसह जिल्हाधिकारी कार्यालयाने कटाक्षाने काळजी घ्यावी, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

कार्यालयीन वेळ सकाळी ९.४५ ते सायं. ६.१५

ग्रामपंचायती चक्क दुपारीच कुलूपबंद!

लोकसूत्र प्रतिनिधी

कळंब : जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर झाल्याने शासकीय यंत्रणेने मुख्यालयी उपस्थित राहून नागरिकांची कामे प्राधान्याने करणे अपेक्षित आहे. वरिष्ठांच्या परवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, असे निर्देश आहेत. मात्र अनेक ग्रामपंचायतच्या कर्मचारी, ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी शासनाच्या यां आदेशाला ठेंगा दिला आहे. चक्क दुपारीच ग्रामपंचायती कुलूपबंद होत आहेत.

गावपातळीवरील प्रशासनाचा महत्त्वाचा दुवा असलेल्या ग्रामपंचायतींच्या कारभाराचे वास्तव वेगळेच असल्याचे चित्र तालुक्यात समोर आले आहे. ग्रामपंचायतींची अधिकृत वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ असताना प्रत्यक्षात मात्र ग्रामपंचायत ला कुलूप बंद करून ठेवण्याचा रोग आहे. ग्रामपंचायत अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याने नागरिकांची कामे खोळंबली आहे. त्यातच काही ठिकाणी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या आशिर्वादामुळे चपराशांची 'कॅटली ' गरम झाली आहे.१५ व्या वित्त आयोगाचे लचके तोडणाऱ्या काही ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना मुख्यालयाची ॲलर्जी झाल्याचे वास्तव असून २,३ दिवसाआड त्यांना ग्रामपंचायतचे दर्शन घडत आहे. यवतमाळ वर्धा येथून ये-जा करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांनां तर ग्रामपंचायतपर्यंत ये-जा करण्यातच धन्यता वाटते.त्यामुळे दुष्काळाच्या काळात नागरिकांना महत्वाचे विविध दाखले, योजना मिळवण्याकरिता नागरिकांनां खेड्यावरून तालुक्यात ये-जा करावी लागत आहे. एकंदरीत यां प्रकाराला रोखण्याचे आव्हान बीडीओंपुढे उभे ठाकले आहे.

नियम काय सांगतो ?

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या २९ फेब्रुवारी २०२० च्या निर्णयानुसार शासकीय कार्यालयांची वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी निश्चित करण्यात आली आहे. ग्रामपंचायत कार्यालयांसाठीही हीच वेळ आहे. मात्र, या वेळेला खो देण्याचे काम शासकीय कर्मचाऱ्यांकडून सुरु आहे.

सहा लाखांच्या रकमेसह डीव्हीआर पळविला, पोलीस अधीक्षकांची घटनास्थळी भेट

पाटणमध्ये भिंत फोडून बँकेची तिजोरी फोडली

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : झरी तालुक्यातील पाटण येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखेला अज्ञात चोरट्यांनी चक्क बँकेच्या मागील बाजूची भिंत फोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी बँकेची तिजोरी फोडून ६ लाख ९ हजार ९२२ रुपयांची रोख तसेच सीसीटीव्ही यंत्रणेतील डीव्हीआर असा ८ लाख ३४ हजार ९२२ रुपयांचा मुद्देमाल लांबविला.

जयंत रमेश घोडे (३३) रा. सुदर्शननगर, हुडकेश्वर, नागपूर, ह.मु. संकटमोचन मंदीर, जगदंबा ले-आऊट, पांढरकवडा असे फिर्यादी बँकेच्या शाखा व्यवस्थापकांचे नाव आहे. २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.४० वाजेपासून ते ३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.५५ वाजेपर्यंतच्या कालावधीत ही चोरी झाल्याचा अंदाज आहे. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी त्यांना घटनेची माहिती महेश्वरी कातुरवार यांनी दिली. तसेच बँकापासून अंदाजे ५० मीटर अंतरावर बँकेची तिजोरी फोडलेल्या अवस्थेत पडल्याचेही त्यांनी सांगितले.शाखा व्यवस्थापकांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता चोरट्यांनी कॅश रूममधील तिजोरी फोडून त्यातील सहा लाख नऊ हजार ९३३ रोख रक्कम नेली. त्याचबरोबर बँकेतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे डीव्हीआरही चोरून नेले. या डीव्हीआरची अंदाजे किंमत २ लाख २५ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे. बँकेतील साहित्यालाही नुकसान पोहोचवले. एकूण आठ लाख ३४ हजार ९२९ रुपयांचा ऐवज लांबविला आहे. याप्रकरणी पाटण पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१(४), ३०५ आणि ३२४(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बँकेतील चोरी नेमकी कोणी केली, चोरट्यांची संख्या किती होती आणि चोरीचा मुद्देमाल कुठे नेण्यात आला, याचा शोध पोलीस घेत आहेत. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सरकटे करीत आहेत. पोलीस अंमलदार विजय बशेश्वर यांची तपास प्रक्रियेत सहभाग आहे.

बँकेत चोरट्यांची तोडफोड

कॅश रूम, कॅश सेफ तसेच लाकडी काऊंटरची तोडफोड करण्यात आली. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे डीव्हीआर, कटर, कॅश काऊंटिंग मशीन आणि कॅश सिक्युरीटीची केबलही तोडफोड केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट

जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी पाटण येथील बँक पोहोचून घटनास्थळाची पाहणी केली. घटनास्थळाच्या तपासबाबत मार्गदर्शन केले. या घटनास्थळासाठी स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, वणी, शिरपूर, मारेगाव, पांढरकवडा येथील अधिकारी व कर्मचारी मंगळवारी दिवसभर पाठीमागचे तडा घेऊन होते. श्वान पथक व असे तज्ज्ञांनादिवेशी पाचारण केले होते.

चोरट्यांच्या शोधासाठी नऊ पथके

बँक चोरी प्रकरणातील आरोपींना हुडकून काढण्यासाठी पोलिसांनी आता ते नऊ पथके गठित करण्यात आली असून ती वेगवेगळ्या दिशेने स्थाना करण्यात आली आहेत. या घटनेसाठी फोरेंसिक टीमलाही पाचारण करण्यात आले होते.

महावितरणच्या कार्यकारी अभियंत्याची माहिती, महावितरणच्या कारभारावर वरिष्ठांचे लक्ष

वडकीच्या कनिष्ठ अभियंत्याला शोकॉज

शंकर जोगी

राळेगाव : वडकीतील महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्याच्या मुख्यालयातील अनुपस्थितीमुळे निर्माण झालेल्या समस्या आणि महावितरणमधील भोंगळ कारभाराबाबत दै. लोकसूत्रने वृत्त प्रकाशित करताच वरीष्ठांनी या बातमीची गंभीर दखल घेतली आहे. या वृत्ताच्या आधारे वडकीतील संबंधित कनिष्ठ अभियंत्याला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याची माहिती यवतमाळातील कार्यकारी अभियंता पी. के. चव्हाण यांनी दिली.

वडकीतील महावितरणच्या उपकेंद्रांतर्गत कार्यरत कनिष्ठ अभियंता मुख्यालयी राहत नाहीत. त्यामुळे परिसरातील वीज ग्राहकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा मुद्दा लोकसूत्रने आपल्या वृत्तातून मांडला होता. कनिष्ठ अभियंत्याच्या अनुपस्थितीत वीज वितरण व्यवस्थेचा कारभार खासगी लाईनमनच्या भरवशावर सुरू असल्याचेही वृत्तात नमूद केले होते. विशेष म्हणजे, महावितरणमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांनी झिरो लाईनमनचा आदेश दिलेला असतानाही वडकी उपकेंद्रातील सर्वच गावामध्ये खासगी लाईनमनकडून कामे करून घेतली जात असल्याचा मुद्दाही उपस्थित केला होता. वीजपुरवठ्यात बिघाड झाल्यास ग्राहकांना वेळेवर सेवा मिळत नसून वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत होता या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठीही अडचणी निर्माण होत असल्याचे चित्र समोर आले होते. या संपूर्ण प्रकाराची दै. लोकसूत्रने बातमीच्या माध्यमातून वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते . त्यामुळे संबंधित कनिष्ठ अभियंत्याला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याने महावितरण विभागात खळबळ उडाली आहे.



दै. लोकसूत्र इम्पॅक्ट

पुढील कारवाईकडे लक्ष!

वृत्ताची दखल घेत प्रशासनाने त्याची दखल घेऊन कार्यवाहीला सुरुवात केल्याचे या घटनेतून दिसून येत आहे. आता संबंधित कनिष्ठ अभियंता नोटिशीला काय उत्तर देतात आणि वरिष्ठ अधिकारी कोणती कारवाई करते, याकडे वडकी परिसरातील वीज ग्राहकांचे लक्ष लागले आहे.

कामाची चौकशी अनिवार्य

वडकीच्या विद्युत वितरण कंपनी उपकेंद्रा अंतर्गत जवळपास ३५ गावे येतात यामध्ये अनेक कामे ही ग्राहकांना तसेच शेतकऱ्यांच्याच सरकार्यातून झालेली आहे. तसेच काही ठिकाणी कंत्राटदारामार्फत थातूरमातुर कामे करून तर कुठे कामच न करता बिले काढली आहे यामध्ये कंपनी चे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. ही झालेली कामे बोगस असल्यामुळे आज सर्वच गावामध्ये समस्या जाणवत आहे. त्यामुळे या कामाची चौकशी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, मुद्रक राहुल माणिकराव ठाकरे यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट नागपूर ४४००१८ येथे मुद्रित करून दै. लोकसूत्र 'शिवभवन' दत्तचौक यवतमाळ-४४५००१ येथे प्रकाशित केले. कार्यकारी संपादक केशव मारोतराव सवळकर (संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) (सर्व वाद यवतमाळ न्यायालया अंतर्गत) ई-मेल : loksutra@gmail.com